PHONE NO. 26478252 / 26474211,
FAX NO : (022) 26472937
E-mail : cedist@mahadiscom.in
**Website : www.mahadiscom.in**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**(A Govt. of Maharashtra Undertaking)**
**CIN : U40109MH2005SGC153645**

PLOT NO G-9, PRAKASHGAD,
Prof. ANANT KANEKR MARG,
BANDRA (E), MUMBAI - 400 051.

**CE(Dist.)/D-IV/Unemployed Engrs Scheme/22200** **Date: 15.05.2015**

## Circular

**To,**
**All Chief Engineers,**
**O & M Zone.**

**Sub: Allocation of works by lottery System to Unemployed Engineers**

**Ref:** 1) I,E& L Deptt.GoM G.R.NO Misc-2015/CR-63/Energy-5 dtd.26.03.2015
2) CE (Dist)/EE(D-IV)/Unemployed Engineer/451 dtd. 09/04/2015
3) ON no. CE (Dist)/EE(D-IV)/GR Lottery work allotment/10 dtd 30/04/2015
4) Board Meeting dtd 15/05/2015.

Industry, Energy & Labour Dept, Government of Maharashtra has announced a policy about "Allocation of work in MSEDCL by Lottery System to Unemployed Engineers." vide Government Resolution no. Misc-2015/CR-63/Energy-5 dtd.26.03.2015.

A Detailed scheme is prepared for Effective implementation of this policy in MAHAVITRAN.

The competent authority has accorded approval to this scheme in the board meeting held on 15/05/2015.

The copy of the scheme is attached herewith.

It is directed to take necessary action for effective implementation of this scheme.

15/5/15
Chief Engineer (Distribution)

Copy to : As per mailing list.

# सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना महावितरण कंपनीमध्ये थेट लॉटरी पध्दतीने काम देण्याबाबतची योजना.

## प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनांतर्गत विविध विभागांच्या प्रशासकीय (अनिवासी) व निवासी नविन इमारतीचे / रस्त्यांचे स्थापत्य बांधकाम तसेच विद्युतीकरण, परिसर प्रकाश योजना, पथदिवे, वातशीतकरण / वातानुकूलन यंत्रणा, उद्वाहन उभार, पाणी पुरवठयासाठी विद्युत पंप उभारणी, वीजपुरवठयासाठी उच्च व लघुदाब उपरी तारमार्ग व रोहित्र उपकरण उभारणी इत्यादी नवीन कामे व त्यांची देखभाल / दुरुस्तीची कामे ही शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असलेल्या स्थापत्य व विद्युत शाखांतर्फे केली जातात.

उपरोक्त कामे पार पाडण्यासाठी महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियमावली सन १९८४ मधील अद्ययावत तरतुदीनुसार विविध तपशीलांच्या रकमेच्या कामांसाठी सार्वजनिक बांधकाम, स्थापत्य व विद्युत शाखांतर्फे विविध प्रवर्गांमध्ये नोंदणी केलेल्या कंत्राटदारांकडून स्पर्धात्मक खुल्या ई-निविदांद्वारे सदर कामे केली जातात.

परंतु, सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या रोजगारीचा प्रश्न सुटावा या दृष्टीने उपरोक्त कामातील ३३ % कामे ही अशा सुशिक्षीत बेरोजगार स्थापत्य / विद्युत अभियांत्रिकी पदवी व पदवीधारकांना विनास्पर्धा सरळ नोंदणी करुन थेट कामे पध्दतीने देण्याची योजना सार्वजनिक बांधकाम विभागात ब-याच वर्षांपासून कार्यरत आहे.

अशाच प्रकारची योजना महावितरण / महापारेषण / महानिर्मिती कंपन्यांमध्ये राबवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. (शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.६३/ऊर्जा-५ दि. २६.०३.२०१५).

या निर्णयानुसार, या योजनेमध्ये महावितरण / महापारेषण / महानिर्मिती कंपन्यांमधील विभागांतर्गत एकूण पार पाडावयाच्या वार्षिक कामांपैकी सरासरी किमान ५० टक्के ठराविक नविन आणि दुरूस्ती / देखभाल (O&M) संबंधीची कामे सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना थेट लॉटरी पद्धतीने कामे देण्यात येणार आहे.

## योजनेचे स्वरुप -

या योजनेमध्ये महावितरण कंपनीमधील ठराविक नवीन आणि दुरूस्ती /देखभाल (O&M) संबंधीची कामे सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांना थेट लॉटरी पद्धतीने वाटप करण्याचे योजिले आहे. त्याचे स्वरुप खालीलप्रमाणे:

- ही सवलत अभियांत्रिकी पदवी / पदविका उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या आत नोंदणी केलेल्या सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना लागू होईल.
- सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांना प्रथम नोंदणीचा वर्ग सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणेच 'ब-१' असा असेल.

- **सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या कामे वाटपांची मर्यादा खालीलप्रमाणे प्रस्तावित आहेः**

➢ सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांद्वारे रु. १०.०० लक्ष पर्यंतच्या किंमतीची कामे पार पाडताना, विभागांतर्गत एकूण पार पाडावयाच्या वार्षिक कामांपैकी सरासरी किमान ५० टक्के कामे ही सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना वाटप करण्याचे निश्चित केलेले आहे.

➢ हया कामांमध्ये खालील ठराविक नवीन आणि दुरूस्ती /देखभाल या कामांचा अंतर्भाव आहे. तसेच, मंडल कार्यक्षेत्रात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था / ग्रामपंचायत / पंचायत समिती / जिल्हा परिषद / महानगरपालिका / नगर पंचायत / नगरपालिका व शासनाच्या इतर विभागामधील विद्युत क्षेत्रातील कामे संबंधीत संस्था थेट लॉटरी पद्धतीकरिता अधिक्षक अभियंता, महावितरण यांच्याकडे शिफारस केलेले कामे यांचा समावेश असू शकेल.

➢ सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना विद्युत कामे वाटपाची एकूण मर्यादा - रु. ५०.०० लक्ष इतक्या किंमतीची असून प्रथम काम कमाल रु. १०.०० लक्ष इतक्या किंमतीचे असेल.त्यानंतर रु. ४०.०० लक्ष इतक्या किंमतीची कामे अशी एकूण रु. ५०.०० लक्ष इतक्या किमतीची निश्चित केलेले आहे. परंतु, देण्यात येणा-या प्रत्येक कामाची कमाल मर्यादा रु. १०.०० लक्ष इतकी असेल.

➢ ज्या सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांनी पहिल्या वर्षात मिळालेली कामे मुदतीत पुर्ण केली त्यांना दुसऱ्या वर्षी रु. १५ लाख रुपयांची कामे थेट लॉटरी पध्दतीने वार्षिक ५ कामे, एकूण रु. ७५ लाख पर्यंतची कामे थेट लॉटरी पध्दतीने देण्यात येतील.

➢ सर्व कनिष्ठ अभियंता / सहाय्यक अभियंता/ उपकार्यकारी अभियंता / अतिरिक्त कार्यकारी अभियंता कार्यकारी अभियंता यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विभागांतर्गत रु. १०.०० लाख पर्यंतची सर्व कामे महिन्याच्या १० तारखेपर्यंत अधिक्षक अभियंता, संबंधीत मंडळ कार्यालय यांच्याकडे पाठवावीत.

➢ एखाद्या मोठया कामाचे तुकडे पाडून ते विशिष्ट वर्गाच्या कामाच्या मर्यादेपर्यंत राहतील असे विभाजन करू नये.

➢ अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय हे अशा कामांची पडताळणी करून पात्र कामांची यादी तयार करतील व अशी मंजूर कामांची यादी लॉटरी दिनांकासहित लॉटरीच्या दिनांकाच्या सात दिवस अगोदर महावितरण कंपनीच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करतील.

➢ तसेच, सदर मंजूर कामांची यादी बैठकीच्या दिनांकासहीत संबंधीत विभागीय / मंडळ कार्यालयाच्या फलकावर प्रसिद्ध करणे बंधनकारक राहील.

➢ अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय यांच्या अध्यक्षतेखाली कामवाटप समिती १५ ते २० तारखेच्या दरम्यान सदर कामांचे थेट लॉटरी पद्धतीने वाटप करतील.

➢ थेट लॉटरी पध्द्तीने वाटप झालेल्या कामांची वर्क ऑर्डर संबंधित सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यास पुढील १० दिवसांच्या आत देण्यात येईल.

**थेट लॉटरी पध्दतीने काम देण्याबाबतचे सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांसाठीचे अर्हता निकष-**

- जे सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंते महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असून ज्यांनी महाराष्ट्र किंवा महाराष्ट्र राज्याबाहेरील अभियांत्रिकी महाविद्यालयातून वा तांत्रिक शिक्षण संचालकांनी मान्यता दिलेल्या तांत्रिक संस्थांमधून पदवी अथवा पदविका प्राप्त केलेल्या दिनांकापासून १० वर्षाच्या आत नोंदणी केली असेल तरच लागू आहे.

- सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंते हे जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्रात नाव नोंदणी केलेले असावेत.

- सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंते यांनी अनुज्ञापक मंडळाकडे विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

- सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंते यांनी विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

- सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांचे नावे नोंदणीकृत संस्था असणे आवश्यक आहे. सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्याकडे पॅन कार्ड असणेही आवश्यक आहे.

**सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंता नोंदणी कार्यपद्धती :-**

- सुशिक्षीत बेरोजगार पदवी / पदवीकाधारक विद्युत अभियंत्यांचा हया योजनेअंतर्गत नोंदणीवर्ग हा महाराष्ट्र शासनाच्या सा.बां विभागाप्रमाणेच बी-१ असा राहिल.

- याकरिता सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांस खालील नमुन्यात कागदपत्रांसहित त्याचे क्षेत्रातील महावितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालयामध्ये अर्ज सादर करावा लागेल.

  १. विहित नमुन्यातील अर्ज **(परिशिष्ट १)**
  २. पदवी / पदवीका परिक्षा उत्तीर्ण झालेल्या प्रमाणपत्राची व गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत
  ३. रहिवाशाचा दाखला (Domecile Certificate)
  ४. पासपोर्ट आकाराचे साक्षांकित फोटो
  ५. जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्रात नाव नोंदणी
  ६. अद्ययावत विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र
  ७. विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र

८. पॅन कार्ड

९. नोंदणी / नुतनीकरणाच्या वेळी बेरोजगार असल्याचे प्रतिज्ञापत्र **(परिशिष्ट - ६)**

१०. शिधावाटप पत्रिका अथवा आधार कार्ड

११. सदर सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्याच्या नावे संस्था असल्याचे कागदपत्रे

- सदर कागदपत्रांची सत्यता पडताळणी झाल्यानंतर कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय सदर सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या नोंदणीचा प्रस्ताव मंजुरीसाठी अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय यांचेकडे ७ दिवसांचे आत पाठवतील. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची शहानिशा करून योग्य असल्यास अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय सदर प्रस्ताव मंजुर करतील. **(परिशिष्ट - २)**

- सदर सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्याकडून नोंदणी शुल्क रु. १५,०००/- भरून अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय अभियंत्यास कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र **(परिशिष्ट - ३)** देतील.

- अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांची नोंदणी रजिस्टर **(परिशिष्ट - ५)** मध्ये ठेवून वेळोवळी अद्ययावत करतील.

- सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्याला नोंदणी केल्यानंतर अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालयातून पासबूक **(परिशिष्ट - ४)** देण्यात येईल. ज्यामध्ये अभियंत्याची व त्याला दिलेल्या कामांची सविस्तर नोंद केली जाईल.

## योजनेअंतर्गत द्यावयाच्या कामांचा तपशील

- सदर योजनेअंतर्गत सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यास थेट लॉटरी पध्दतीने विविध क्षेत्रीय कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या कामांचा समावेश खालील प्रमाणे :

    - वेळोवळी क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात येणारी देखभाल व दुरुस्तीची कामे. (जशी झुकलेले पोल सरळ करणे, झाडे तोडणे, अर्थिंग करणे, स्टे लावणे, पोलला कॉंक्रीटींग/मफिंग करणे, तुटलेल्या वाहिन्या जोडणे, लोंबकळत्या सैल तारा घट्ट करणे, वादळवाऱ्याने नुकसान झालेली कामे करणे इत्यादी.)

- ○ पायाभूत आराखडा-२ योजनेमधील आधुनिकीकरण आणि सक्षमीकरण (U & M works)
- ○ डी. पी. डी. सी. (DPDC) TSP+OTSP, SCP, General.
- ○ राज्य शासनाने मंजुर केलेल्या विविध योजनेमधील कामे.
- ○ विद्युत वितरण प्रणाली स्थलांतरण (Shifting)

- वरील योजनेतंर्गत येणाऱ्या प्रत्येक कामाची कमाल मर्यादा रु. १०.०० लक्ष.

**योजनांतर्गत कामांचे दरपत्रक (Schedule of Rates/Cost Data)**

- सदर योजनेअंतर्गत वाटप केलेल्या कामांसाठीचे दर हे महावितरण कंपनीच्या वरील कामांच्या त्या त्या कामांशी निगडीत अद्ययावत मंजुर दरपत्रकाप्रमाणे राहतील.

**योजनेची कार्यपद्धती :-**

- सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना विनास्पर्धा कामे वाटप करण्यासाठी जिल्हावार काम वाटप समिती कार्यरत असेल. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| ○ प्रत्येक जिल्हयाशी संबंधीत त्या मंडळाचे अधीक्षक अभियंता | अध्यक्ष |
| ○ कार्यकारी अभियंता (मंडळ कार्यालयातील) | सदस्य सचिव |
| ○ व्यवस्थापक (वित्त व लेखा) वा तत्सम अधिकारी | सदस्य |
| ○ कामे वाटप करावयाच्या संबंधीत त्या विभागाच्या कामापुरता कार्यकारी अभियंता (विशेष निमंत्रित) | सदस्य |
| ○ कामे वाटप करावयाच्या संबंधीत त्या उपविभागाच्या कामापुरता उप कार्यकारी अभियंता / अतिरिक्त कार्यकारी अभियंता | सदस्य |

**कार्यपद्धती:**

**थेट लॉटरी प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी सर्वसाधारण नियम व अटी -**

१. सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांकडे महाराष्ट्र शासनाची अधिकृत वैध अनुज्ञाप्ती आवश्यक असून महावितरण कंपनीमध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे.

२. महावितरण कंपनीकडे नोंदणीकृत विद्युत बेरोजगार अभियंत्यांना लॉटरीचेवेळी अद्ययावत भरलेले पासबूक असणे बंधनकारक राहील. अद्ययावत भरलेले पासबुक असल्याखेरीज अभियंत्यास थेट लॉटरी पध्दतीने काम वाटप करण्याच्या प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही.

३. नोंदणीपात्र अभियंत्यांना नोंदणीचे वेळी ते बेरोजगार असल्याबाबत व त्यांनी अन्यत्र कोठेही नोंदणी केली नाही, तसेच कोठेही शासकिय / निमशासकिय अथवा खाजगी आस्थापनेत नोकरीत नाही अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र (**परिशिष्ट - ६)** तसेच, इतर कोणत्याही शासकिय / निमशासकिय अथवा खाजगी आस्थापनेत केलेल्या / करत असलेल्या कामांचा रकमा याबाबतचा तपशील सदरील प्रतिज्ञापत्रात उल्लेख करणे बंधनकारक राहील.

४. सदर सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंता तो रहात असणाऱ्या क्षेत्रातील म्हणजेच ज्या ठिकाणचे विद्युत ठेकेदाराचे अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र आहे अशा त्या मंडळ क्षेत्रातील कामांसाठीच्या लॉटरीमध्ये सहभागी होण्यास पात्र असेल.

**थेट लॉटरी प्रक्रियेमधील काम वाटपाची रुपरेषा -**

१. सदर योजनेअंतर्गत सुशिक्षीत बेराजगार विद्युत अभियंत्याद्वारे रु. १०.०० लक्ष पर्यंतच्या किंमतीची कामे पार पाडताना विभागांतर्गत एकूण पार पाडावयाच्या वार्षिक कामांपैकी सरासरी **अंदाजे ५०%** कामे ही याअंतर्गत वाटप करणे आवश्यक आहे.

२. एखाद्या मोठया कामाचे तुकडे पाडून ते विशिष्ट वर्गाच्या कामाच्या मर्यादेपर्यंत राहतील असे विभाजन करू नये.

३. लॉटरी पद्धतीने काम वाटपासंदर्भात योग्य ते निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार कामवाटप समितीस राहतील.

४. लॉटरी पद्धतीत कुठलीही अनियमितता होणार नाही याबाबतची जबाबदारी कामवाटप समितीची राहिल.

५. काम वाटप करताना विशिष्ट सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांला काम देण्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून / विभागाकडून तोंडी किंवा लेखी प्राप्त झालेल्या शिफारशीचा विचार करू नये.

६. काम वाटप बैठकीत कामवाटप बैठकीचे अध्यक्ष, समिती सदस्य व काम घेण्यास इच्छुक सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंता हेच उपस्थित राहतील. इतरांना बैठकीत हजर राहण्यापासून मज्जाव करण्यात येईल.

७. सर्व कनिष्ठ अभियंता / सहाय्यक अभियंता/ उपकार्यकारी अभियंता / अतिरिक्त कार्यकारी अभियंता कार्यकारी अभियंता यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विभागांतर्गत रु. १०.०० लाख पर्यंतची सर्व कामे महिन्याच्या १० तारखेपर्यंत अधिक्षक अभियंता, संबंधीत मंडळ कार्यालय यांच्याकडे पाठवावीत.

८. अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय हे अशा कामांची पडताळणी करून पात्र कामांची यादी तयार करतील व अशी मंजूर कामांची यादी लॉटरी दिनांकासहित लॉटरीच्या दिनांकाच्या सात दिवस अगोदर महावितरण कंपनीच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करतील. तसेच, सदर मंजूर कामांची यादी बैठकीच्या दिनांकासहीत संबंधीत विभागीय / मंडळ कार्यालयाच्या फलकावर प्रसिद्ध करतील.

९. अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय यांच्या अध्यक्षतेखाली कामवाटप समिती १५ ते २० तारखेच्या दरम्यान सदर कामांचे थेट लॉटरी पद्धतीने वाटप करतील.

१०. **थेट लॉटरी पद्धतीने कामे वाटपाची कार्यपद्धती खालीलप्रमाणे राहील.**

- प्रसिद्धीस दिलेल्या कामांच्या अनुषंगाने जे सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंते आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रतीसह हजर होतील, त्यांना कामांच्या उपलब्धतेनुसार एक काम थेट लॉटरी पद्‌धतीने (चिठ्ठया टाकून) अशा अभियंता ठेकेदारांचे उपस्थितीत समिती वाटप करील.

- असे लॉटरीने काढलेले कामे सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यास नको असल्यास आणि लॉटरीमध्ये अधिक कामांचा अंतर्भाव असल्यास त्या अभियंत्यास आणखी दोनवेळा लॉटरीमध्ये भाग घेता येईल. जर अशा रितीने, एकूण तीन वेळा त्याच किंवा नंतरच्या बैठकीत लॉटरीने काढलेले काम नाकारले अथवा थेट लॉटरी समयी अनुपस्थित राहिले तर मात्र त्यांना या प्रकारे विनास्पर्धा काम मिळणार नाही.

- वाटप समितीकडून विनास्पर्धा देण्यात आलेले एक काम त्यांचे पसंतीप्रमाणे मिळाले नसेल व उपलब्ध कामाच्या यादीतील दुसऱ्या सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांला मिळालेले काम पसंत असेल तर अशा दोन्ही अभियंत्यांनी लॉटरीत मिळालेले काम वाटप समितीचे लेखी संमतीने आपापसांत बदलवून घेण्यास हरकत नसावी. यासाठी दोन्ही अभियंत्यांची लेखी संमती आवश्यक राहील.

११. सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांना थेट लॉटरी पद्धतीने कामाचे वाटप केल्यानंतर कार्यादेश देण्यापूर्वी भरावयाची बयाणा रक्कम (Earnest Money) भरण्यापासून पूर्ण सूट व सुरक्षा ठेव (Security Deposit) भरण्यापासून ५० टक्के सूट राहील.

१२. थेट लॉटरी पद्धतीने वाटप झालेल्या कामांची वर्क ऑर्डर संबंधित सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यास पुढील १० दिवसांच्या आत देण्यात येईल. सदर वर्क ऑर्डरमध्ये नमुद करावयाच्या अटी व शर्ती **परिशिष्ट ७** मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

१३. काम वाटप समितीने संबंधित सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यास थेट लॉटरी पद्धतीने काम वाटप केल्यानंतरच त्या कामाच्या कार्यारंभ आदेशाची नोंद अभियंत्याच्या पासबुकात केल्यानंतरच कार्यारंभ आदेश निर्गमित होतील, याची दक्षता घ्यावी.

१४. सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांना केलेले काम वाटप व त्याअनुषंगिक सविस्तर नोंदी मंडळ कार्यालयात ठेवलेल्या रजिस्टरमध्ये वेळोवळी अद्ययावत करण्यात येईल.

१५. सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंता हा उत्कृष्ट कंत्राटदार व्हावा याकरिता योग्य ते आवश्यक सहकार्य केले जाईल. सदर विद्युत अभियंत्याकडून महावितरण कंपनीच्या प्राकलन / ड्रॉईंग / मेथड ऑफ कन्स्ट्रक्शन / गुणवत्ता निकष, इ. याप्रमाणे केलेली कामांची त्रयस्थ यंत्रणमार्फत अथवा नियुक्त केलेले अभियंते / अधिकाऱ्यांमार्फत तपासणी केली जाईल व सदर कामे निकृष्ट स्वरुपाची आढळल्यास सदर अभियंत्यांचा परवाना रद्द केला जाईल व सदर योजनेमध्ये अपात्र ठरविण्यात येईल.

१६. सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना त्यांचे नोंदणी वर्गाप्रमाणे खुल्या स्पर्धात्मक निविदा भरता येईल व त्यासाठी हया योजनेतील नियम, अटी व शर्ती लागू असणार नाहीत.

परिशिष्ट -१

( MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

CIN : U40109MH2005SGC153645

**APPLICATION FORM FOR REGISTRATION OF DEGREE/ DIPLOMA ENGINEERS AS CONTRACTOR**

(Cross signed on Photograph)

1. Name of Applicant and Present & : Permanent Address & Firm Name

2. Date of Birth :

3. Place of Birth :

4. Technical qualification with year of Passing (Degree/diploma/name of Institute/University). :

5. Place of Business :

6. Name of Bankers and Full address :

7. Class in which enrolment is sought :

8. Whether enlisted in the department or any other organization. If so, State the category and enclose copy of certificate. :

I certified that I have not been/ will myself registered as Contractor in the department under more than one name.

Signature of Applicant

**परिशिष्ट -१ अ**

<u>**विषय**</u> :- सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना मिळणाऱ्या सवलती अंतर्गत विद्युत ठेकेदार " वर्ग ब-१ " मध्ये सरळ नोंदणी मिळणेसाठी पूर्ण करावयाच्या बाबी.

मे ..............................................................................................यांचा अर्ज.

**// तपासणी सुची //**

| **अ.क्र** | **आवश्यक बाबी** | | **ठेकेदार यांनी पूर्तता केलेल्या बाबी.** |
|---|---|---|---|
| १. | नोंदणीसाठी विहित नमुन्यात अर्ज सादर केला आहे काय ? | : | होय, कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| २. | सुशिक्षित बेरोजगार अभियंता विद्युत ठेकेदार पूर्वी नोंदणी झाली होती काय ? नोंदणी प्रमाणपत्र सादर केले आहे काय? | : | होय/ नवीन नोंदणी<br>दिनांक ............ पर्यंत नोंदणी मंजूर आहे.<br>कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| ३. | अनुज्ञापक मंडळाकडील विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्ती अद्ययावत प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | : | होय, प्रमाणपत्र क्रमांक ................................<br>दिनांक ...................... अखेर वैध आहे.<br>कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| ४. | विद्युत अभियंता पदवी/पदविका परीक्षा उतीर्ण झाल्याचे वर्ष प्रमाणपत्र व गुणपत्रिकेची प्रत सादर केली आहे काय ? | : | होय, सन ......................<br>कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| ५. | विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र सादर केले आहे काय? | : | होय, प्रमाणपत्र क्रमांक ......................<br>कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| ६. | अनुज्ञापन मंडळाने दिलेले सेवानियुक्त पर्यवेक्षक/तारतंत्री आणि शिकाऊ उमेदवार यांची नोंदवही सादर केली आहे काय ? | : | होय, कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| ७. | स्वतःचे साक्षांकित पासपोर्ट आकाराचे फोटो प्रस्तावासोबत जोडले आहेत काय ? | : | होय, कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| ८. | नोंदणी/नुतनीकरणाच्या वेळी अर्जदार बेरोजगार असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे काय ? | : | होय, कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| ९. | कार्यकारी दंडाधिकारी यांनी अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असल्याबाबत दिलेले अधिवास व राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | : | होय, कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| १०. | हत्यारे व सयंत्रे यांची सूची सादर केली आहे काय ? | : | होय, कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | अर्जदार हा संबंधीत जिल्हयातील रहिवासी असला पाहिजे याच्या पडताळणीसाठी शिधावाटप पत्रिकेची/आधार कार्ड प्रत जोडली आहे काय? तसेच जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शक केंद्रात नाव नोंदणी केलेली आहे काय ? | : | होय, कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| १२. | आयकर विभागाकडील पॅन कार्ड जोडले आहे काय ? | : | होय, कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| १३. | अर्ज नुतनीकरणासाठी सादर केली असल्यास केलेल्या कामांचा तपशील अद्ययावत नोंदीसह पासबुकाची सत्यप्रत जोडली आहे काय ? | : | होय/ नवीन नोंदणी असल्यामुळे लागू नाही. कृपया पृष्ठ क्रमांक पहावे. |
| १४. | विद्युत अभियंता पदवी/पदविका परिक्षा उत्तीर्ण केले असेल तर अर्हता प्राप्त केल्याच्या तारखेपासून १० वर्षाच्या आत अर्ज करणारे सुशिक्षित बेरोजगार अभियंते वरील सवलती अतंर्गत नोंदणी मिळण्यास पात्र ठरतात. सदर अटीची पूर्तता होते काय? | : | होय, |
| १५. | नोंदणीचे अर्धे शुल्क भरणा केला आहे काय? | : | होय पावती क्रमांक दिनांक अन्वये रु. भरले आहेत. |
| १६. | इतर अन्य बाबी | : | |

**परिशिष्ट -२**

[महाराष्ट्र शासन [उपक्रम])
CIN : U40109MH2005SGC153645

जा.क्र/

प्रति,

**विषय : <u>सुशिक्षित बेरोजगार अभियंता अंतर्गत</u>**
विद्युत ठेकेदार वर्ग "ब-१" मध्ये करिता मंजूरीबाबतचा अर्ज.

कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, मराविविकंम यांनी पाठविलेल्या प्रस्तावास अनुसरून आपण श्री. -------------------------, ठेकेदार (म.ठे.क्र. ) यांना **सुशिक्षित बेरोजगार अभियंता अंतर्गत** विद्युत ठेकेदार वर्ग ब-१ यांमध्ये खालील शर्तीच्या अधीन राहून **नोंदणीस प्रायोगीक तत्वावर <u>५ (पाच) वर्षाकरिता</u>** मंजूरी देण्यात येत आहे.

१. आपणांस सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर हया कार्यालयाशी संपर्क साधून नोंदणी शुल्क रु. १५,०००/- भरणे आावश्यक आहे. भरलेल्या रकमेची भरणा पावतीची छायांकित प्रत या कार्यालयास सादर केल्यावर आपणांस प्राधिकृत केल्याप्रमाणे नोंदणीचा दाखला देण्यात येईल.

२. आपण शासकीय संस्था/अर्धशासकिय संस्था/ स्वायत्त संस्था/ खाजगी संस्था इ. कडून स्विकारलेल्या/पूर्ण केलेल्या/कामे सुरु असलेल्या कामांची योग्य त्या नोंदी व त्याबद्दलची वार्षिक विवरणपत्रे तसेच, दरवर्षी सोपविलेली कामे याबद्दलची कार्यक्षमती प्रमाणपत्र (परफॉर्मन्स सर्टिफिकेट) वेळोवेळी सादर करणे आवश्यक आहे.

३. आपण नोंदणीचे नुतनीकरण करण्यासाठी हया नोंदणीची मुदत संपण्यापूर्वी ३ महिने अगोदर आवश्यक ती सर्व कागदपत्र जोडून विहीत नमून्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१) शासन निर्णय क्र संकिर्ण-२०१५/प्र.क्र.६३/ऊर्जा-५ दि. २६.०३.२०१५ च्या प्रचलित नियमानुसार आपणांस नोंदणीकृत असलेल्या क्षेत्रातील अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, महावितरण यांचेमार्फत लॉटरी पद्धतीने देण्यात येणा-या विद्युत कामे वाटपाची एकूण मर्यादा - <u>रु. ५०.०० लक्ष</u> इतक्या किंमतीची असून प्रथम काम कमाल रु. <u>१०.०० लक्ष</u> इतक्या किंमतीचे असेल.त्यानंतर <u>रु. ४०.०० लक्ष</u> इतक्या किंमतीची कामे अशी एकूण <u>रु. ५०.०० लक्ष</u> इतक्या किमतीची निश्चित केलेले आहे. परंतु, देण्यात येणा-या प्रत्येक कामाची कमाल मर्यादा <u>रु. १०.०० लक्ष</u> इतकी असेल.

---contd---

२) आपण प्रथम रु. १०.०० लक्ष रक्कमेपर्यंतची कामे समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतरच उर्वरित एकूण रु. ४०.०० लक्ष रक्कमेपर्यंतची कामे विनानिविदा देण्यातबाबत कार्यवाही करण्यात येईल. मात्र नोंदणीकृत असलेल्या क्षेत्रात महावितरण कंपनीव्यतिरिक्त इतर शासकीय / निमशासकिय विभागांचीसुध्दा सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता म्हणून काम घेतल्यास त्याची नोंद महावितरण कंपनीच्या अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालयातून दिलेल्या पासबुकामध्ये नोंदविणे बंधनकारक आहे. तसेच, सदरील सर्व कामे मिळून क्षेत्रातील रु. ५०.०० लक्षपर्यंतची कामे पूर्ण झाल्यानंतर उपरोक्त नोंदणी संपुष्टात येईल.

३) उपरोक्त मंजूरी आपणाकडे कार्यरत असलेले पर्यवेक्षक श्री. ----------- (पर्यवेक्षक क्रमांक म.प. --------- ) हे सेवेत असेपर्यत ग्राहय राहील. उपरोक्त पर्यवेक्षक हजेरी / नोंदणीपटावर कार्यरत नसल्यास नोंदणी रद्दबादल ठरेल याची नोंद घ्यावी.

४) सदर नोंदणी ही विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्ती दरवर्षी नुतनीकरण करण्याच्या अधीन राहून देण्यात येत आहे. तसेच याबाबत अनुज्ञापक मंडळाकडून दरवर्षी अनुज्ञाप्ती नुतनीकरण प्राप्त केल्याची सत्यप्रत हजेरीपटासह या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

**सवलत :-**

सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंता अंतर्गत नोंदणी असल्याने, शासन नियमानुसार सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंता अंतर्गत असलेल्या निविदेसाठीच बयाणा रक्कम भरण्यापासून आपणांस सूट देण्यात येईल. तसेच ठरवून देण्यात आलेल्या अनामत रकमेच्या ५०% रक्कम भरण्याबाबत सवलत देण्यात येईल.

वरील शर्तीचे आपणाकडून उल्लघंन झाल्यास आपली नोंदणी रद्द करण्यात येईल याची योग्य ती दखल घ्यावी.

अधिक्षक अभियंता<br>
मंडळ कार्यालय, महावितरण

**<u>प्रत माहितीकरीता सस्नेह अग्रेषित :-</u>**

कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महावितरण

**परिशिष्ट -३**

[महाराष्ट्र शासन [उपक्रम])
CIN : U40109MH2005SGC153645

## :कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र:

प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद केलेल्या तपशीलान्वये महावितरण कंपनीतर्फे अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, मध्ये प्रायोगिक तत्वावर **सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंता** अंतर्गत वर्ग ब-१ विद्युत कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र खालील शर्तीच्या अधिन राहून दिले आहे.

१) कंत्राटदाराचे नांव :
२) विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्ती क्र. :
३) पूर्ण पत्ता :

४) नोंदणी वर्ग :
५) नोंदणी क्रमांक :
६) नोंदणीची मुदत :
७) कामे घेण्याची पात्रता :

**शर्ती :-**

१) ठेकेदाराने स्विकारलेल्या,पुर्ण केलेल्या अथवा सुरु केलेल्या कामांची नोंद ठेवावी व त्याबद्दल वार्षिक विवरणपत्र ठेकेदाराच्या सुधारीत नियम क्रमांक १२ (ब) प्रमाणे कार्यकारी अभियंता किंवा विद्युत संच मांडणीचे काम सोपविणारे अधिकारी यांच्याकडून ठेकेदारास सोपविलेली कामे कशाप्रकारे पार पाडली त्याबद्दलची कार्यक्षमतेची प्रमाणपत्रे (परफॉर्मन्स सर्टीफिकेट) घेऊन दरवर्षी ३० एप्रिल रोजी या कार्यालयास विहीत नमुन्यात सादर करावीत.

२) ठेकेदारांनी नोंदणीचे नुतनीकरण करण्यासाठी नोंदणीची मुदत संपण्यापूर्वी ३ महिने अगोदर आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह विहित नमुन्यात अर्ज सादर केला पाहिजे.

३) ठेकेदाराने नोंदणीबाबतच्या शासन निर्णय क्र संकिर्ण-२०१५/प्र.क्र.६३/ऊर्जा-५ दि. २६.०३.२०१५ च्या प्रचलित नियमानुसार आपणांस नोंदणीकृत असलेल्या क्षेत्रातील अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, महावितरण यांचेमार्फत लॉटरी पद्धतीने देण्यात येणा-या विद्युत कामे वाटपाची एकूण मर्यादा - रु. ५०.०० लक्ष इतक्या किंमतीची असून प्रथम काम कमाल रु. १०.०० लक्ष इतक्या किंमतीचे असेल.त्यानंतर रु. ४०.०० लक्ष इतक्या किंमतीची कामे अशी एकूण रु. ५०.०० लक्ष इतक्या किमतीची निश्चित केलेले आहे. परंतु, देण्यात येणा-या प्रत्येक कामाची कमाल मर्यादा रु. १०.०० लक्ष इतकी असेल.

४) प्रथम रु. १०.०० लक्ष रक्कमेपर्यंतची कामे समाधानकारकरित्या केल्यानंतरच उर्वरित एकूण रु. ४०.०० लक्ष रक्कमेपर्यंतची कामे विनानिविदा देण्यातबाबत कार्यवाही करण्यात येईल. मात्र

---contd---

नोंदणीकृत असलेल्या क्षेत्रात महावितरण कंपनीव्यतिरिक्त इतर शासकीय / निमशासकिय विभागांचीसुध्दा सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता म्हणून काम घेतल्यास त्याची नोंद महावितरण कंपनीच्या अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालयातून दिलेल्या पासबुकामध्ये नोंदविणे बंधनकारक आहे. तसेच, सदरील सर्व कामे मिळून क्षेत्रातील रु. ५०.०० लक्षपर्यंतची कामे पूर्ण झाल्यानंतर उपरोक्त नोंदणी संपुष्टात येईल.

५) उपरोक्त मंजूरी आपणाकडे कार्यरत असलेले पर्यवेक्षक श्री. ----------- (पर्यवेक्षक क्रमांक म.प. --------- ) हे सेवेत असेपर्यत ग्राहय राही. उपरोक्त पर्यवेक्षक हजेरी/नोंदणीपटावर कार्यरत नसल्यास नोंदणी रद्दबादल ठरेल याची नोंद घ्यावी.

६) सदर नोंदणी ही विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्ती दरवर्षी नुतनीकरण करण्याच्या अधीन राहून देण्यात येत आहे तसेच याबाबत अनुज्ञापक मंडळाकडून दरवर्षी अनुज्ञाप्ती नुतनीकरण प्राप्त केल्याची सत्यप्रत हजेरीपटासह या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

७) ठेकेदार यांनी या कार्यालयास सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे उपरोक्त नोंदणी मंजूर करण्यात येत असून प्रस्तुत माहितीमध्ये काहीही बदल झाल्यास त्यानुसार हया कार्यालयास त्वरीत कळविणे बंधनकारक आहे.

**सवलती :-**

**(फर्मचे नाव---)** यांची सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता अंतर्गत नोंदणी असल्याने, शासन नियमानुसार सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंता अंतर्गत असलेल्या निविदेसाठीच बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येत आहे. तसेच ठरवून देण्यात आलेल्या अनामत रक्कमेच्या ५०% रक्कम भरण्याबाबत सवलत देण्यात येत आहे.

| |
|---|
| कंत्राटदाराची नमुना स्वाक्षरी |

अधिक्षक अभियंता
मंडळ कार्यालय, महावितरण

<u>**प्रत माहितीकरीता सस्नेह अग्रेषित :-**</u>

कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महावितरण

**परिशिष्ट - ४**

**पृष्ठ क्रमांक १**

सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांना विनास्पर्धा देण्यात आलेल्या कामांची नोंद दर्शविणारे पासबूक.

(सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांनी स्वत:कडे ठेवण्यासाठी)

१. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांचे नांव :

२. कायमचा पत्ता :

३. नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक :

४. नोंदणी देणा-या विभागाचे नांव :

५. नोंदणीचा कालावधी :

---

**पृष्ठ क्रमांक २**

(प्रत्येक कामासाठी एक पृष्ठ)

१. लॉटरी पध्दतीने मिळालेल्या कामाचे नांव :

२. लॉटरी क्रमांक :

३. कामाची किंमत :

४. काम देणा-या मंडळ / विभागाचे नांव :

५. काम पूर्ण करण्याची मुदत :

६. काम देणा-या विभाग प्रमुख / विभागीय लेखाधिकारी यांची स्वाक्षरी :

७. काम पूर्ण केल्याचा दिनांक :

८. शेरा / विभाग प्रमुखांची काम पूर्ण झाल्यानंतर शे-यासहीत स्वाक्षरी

**परिशिष्ट -५**

**सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांना विनास्पर्धा देण्यात आलेल्या कामांची नोंद दर्शविणारे रजिस्टर.**

**(सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांनी स्वतःकडे ठेवण्यासाठी)**

**१. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांचे नांव :**

**२. कायमचा पत्ता :**

**३. नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक :**

**४. नोंदणी देणा-या विभागाचे नांव :**

**५. नोंदणीचा कालावधी :**

| अ. क्र. | प्राधिकार | वर्ग क्रमांक | कालावधी | प्रमाणपत्र दिनांक | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

# AFFIDAVIT

**I,**

**------------------------------------------------------ S/o-------------------------------------------------** Age ---------------- years, occupation business of Electrical Contractor do hereby stamp on oath as under :

That I am residing in ---------------------------------------locality of District--------------------- Since last------------years. That I am the sole proprietor of a proprietor concern name and style as----------------------------------- Electrical Contractor Licensed No------------ " & Supervisor Licensed No. ------------------------having its office at--------------------------------- District---------------------------- dealing in business of Government, Electrical Contracts and ancillary works attached thereof I have passed Diploma/Degree in Electrical Engineer in the Year-----------------

Our firm is registered/is to be registered In Class "B-1" under the Govt. Scheme of registration for unemployed engineers in P.W.D. I further state that at present I am not employee or partner in any capacity of any firm, and not registered under this scheme any other department. **I am till the date Unemployed Engineer**.

The firm is not black listed in any other Govt./Semi Govt. Organization or this Department.

The Affidavit is made for the purpose of registration/renewal of registration as a Electrical Contractor Unemployed Engineer.

Whatever stated herein above is true & correct to the best of my Knowledge and belief.

Hence this affidavit

Deponent --------------------------

**Not:- This Affidavit should be done in the Court of Executive magistrate.**

## PROPRIETOR'S PHOTOGRAPH

| |
|---|
| (Cross signed on Photograph) |
| |

| |
|---|
| **Address :** |

## लॉटरी पद्धतीने देण्यात येणाऱ्या कामाच्या वर्क ऑर्डरमध्ये समाविष्ट करावयाच्या अटी व शर्ती

सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यास लॉटरी पद्धतीने देण्यात येणाऱ्या कामाची वर्क ऑर्डर देतेवेळी कमीत कमी खालील अटी व शर्ती ठरविण्यात याव्यात. सदर अटी व शर्ती यांमध्ये परिमंडळांतर्गत एकसमानता असण्यासाठी मुख्य अभियंता, (सं व सु) परिमंडळ कार्यालयातुन ठरविण्यात येऊन मंडळ कार्यालयात वितरीत करण्यात याव्यात.

- सुरक्षा ठेव रक्कम
- कामाचे स्वरुप (Scope of work)
- कामाचा कालावधी (Work Period)
- दंड (Penalty (Liquidity damage))
- पेमेंट द्यावयाच्या अटी ( Payment terms)
- कृती अहवाल (Performance Report)
- दरपत्रक (Scheduled Rate)
- कंत्राट करार (Contract Agreement)
- करार संपुष्टता (Termination of Contract)
- कामाची गुणवत्ता (Quality of Work)
- काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र (Final work completion certificate)
- सुरक्षाठेव परतावा (Refund of Security deposit)
- कामाची खात्री (Performance Guarantee)
- त्रुटी / दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period)
- करप्रणाली (Taxation)
  - सेवाकर (Service tax) व महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर (MVAT)

** याव्यतिरिक्त वर्क ऑर्डरमध्ये कंत्राटदाराशी करित असलेल्या करारातील इतर अटी व शर्ती यांचा आवश्यकतेनुसार समावेश करण्यात यावा.

---

## सेवाकर (Service tax) व महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर (MVAT) लागू करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी.

प्रचलीत पद्धतीनुसार कंत्राटदाराची सेवाकर (Service tax) व महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर (MVAT) या दोन्ही कायदांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे. परंतु, हया पद्धतीत सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्याने यापुर्वी काम केले नसल्यास सुरूवातीस अशी नोंदणी असणे आवश्यक नाही.

मात्र, लॉटरी पद्धतीने सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यास कामाचे वाटप झाल्यास त्यावर्षात होणारी एकूण विक्री व सेवा यानुसार उल्लेखित कायद्यातील प्रचलित तरतुदीनुसार नोंदणी करणे आवश्यक आहे.

अशी नोंदणी केली असल्यास सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यास महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर (MVAT) चे payment देण्यात यावे. परंतु, अशा प्रकारची नोंदणी नसल्यास payment करण्यात येऊ नये. तसेच, महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर (MVAT) कायद्याच्या प्रचलित तरतुदीनुसार WCT बिलातून वजा करण्यात यावा.

तसेच, सेवाकर (Service tax) कायद्यांतर्गत नोंदणी नसल्यास works contract या सेवेसाठी प्रचलित नियमानुसार लागू असणारे सेवाकरातील ५०% रक्कम बिलातून वजावट करून सेवाकर विभागाला भरण्यात यावा.